| | |
|---|---|
| | **संक्षीप्त फौ. खटला क्र.१५७/२०२५**<br>सरकार विरुध्द संदीप<br>CNR No.MHLA060006612025 |

१. गुन्हा घडल्याचा दिनांक – ०४/०२/२०२५

२. अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक – ०४/०२/२०२५

३. फिर्यादीचे नाव – **विनायक ज्ञानोबा सुर्यवंशी,**
पोलीस पोलीस मुख्यालय, लातूर.

४. आरोपीचे नाव – **संदीप वामन भोगे,**
वय– ३३ वर्ष, कामधंदा–
रा.हाडोळती, ता.अहमदपूर, जि.लातूर.

५. गुन्हयाचा तपशील –

दिनांक ०४/०२/२०२५ रोजी १७.२० वाजताच्या सुमारास मौजे हाडोळती, ता.अहमदपूर येथील कोहीनुर टपरीच्या पाठीमागे तुम्ही विनापरवाना बेकायदेशिररित्या स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असताना मिळून आलात आणि याद्वारे तुम्ही महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२(अ) अन्वये शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केला.

६. **<u>आरोपीचे प्रतिकथन</u>**

प्रश्न – तुम्हाला पोलीस केस पेपरच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर – होय.

प्रश्न – तुम्हाला वाचून दाखविलेला आरोप तुम्हाला समजला काय ?

उत्तर – होय.

प्रश्न – तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर – होय, आम्हाला गुन्हा कबूल आहे.

----------

आरोपीची स्वाक्षरी

आरोपीस माझे समक्ष आरोपाचा तपशील त्याच्या भाषेत वाचून दाखविण्यात आला, तो त्यास कबूल आहे.

समक्ष,

**(स्वानंदी दे. वडगांवकर )**

दिनांक १२/०८/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर

**<u>–: आदेश :–</u>**

प्रस्तुत प्रकरणात आरोपीने स्वतः जाणीवपूर्वक गुन्हा कबूल असले बाबत पुरसीस निशाणी क्र.**०५** कडे दाखल केली. आरोपीस गुन्ह्याच्या गांभीर्याबाबत व शिक्षेबाबत समजावून सांगितले. तसेच आरोपीकडून जाणीवपूर्वक गुन्हा कबूल करत असल्याची खात्री करुन घेतली. आरोपीने कमीतकमी दंड व शिक्षा व्हावी अशी विनंती केली. अभिलेखाच्या अवलोकनांती आरोपीस यासारख्या गुन्ह्यात शिक्षा झाल्याचे दिसून येत नाही. उपरोक्त कथनांच्या विचारांती आरोपीवरील असणारी जबाबदारी पाहता, माझ्या मते खालील प्रमाणे आदेश करणे न्यायसंगत ठरेलः–

**निशाणी ०१**

## –: आदेश :–

०१. आरोपी नामे **संदीप वामन भोगे** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये जुगार कायदा कलम १२(अ) च्या गुन्हयाकरीता दोषी धरण्यात येते व रक्कम **रुपये ३००/– (तिनशे रुपये)** द्रव्य दंडाची शिक्षा देण्यात येत आहे. आरोपीने द्रव्य दंडाची रक्कम न भरल्यास आरोपीस या गुन्ह्याकरीता ०३ दिवसांची साध्या कैदेची शिक्षा ठोठावण्यात येते.

०२. अभिग्रहण करण्यात आलेला जप्त मुद्देमाल रोख रक्कम रुपये १८५०/– (रक्कम रुपये आठराशे पन्नास ) ही सरकार जमा करण्यात यावी, अभिग्रहण करण्यात आलेले जुगार साहीत्य निरर्थक व मुल्यहीन असल्यामुळे नाश करण्यात यावे. तसेच जप्त करण्यात आलेल्या विवो टीआयएक्स कंपनीचा निळ्या रंगाचा मोबाईल, एक विवो ओ वाय ७३ कंपनीचा निळ्या रंगाचा असे दोन मोबाईल व एक सटीझन सीटी ५५५ कंपनीचा कॅल्क्युलेटर लिलाव करण्यात यावे व त्याची रक्कम सरकार जमा करण्यात यावी.

(आदेश खुले न्यायालयात जाहीर).

WADGAONKAR SWANANDI DEVIDAS

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.08.12 17:52:39 +0530

**(स्वानंदी दे. वडगांवकर )**

दिनांक १२/०८/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर